# अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.क्षे.क.म.) बृहन्मुंबई यांचे कार्यालय,

प्रशासकीय इमारत, ५ वा मजला, शासकीय वसाहती समोर, बांद्रा (पूर्व) मुंबई - ४०० ०५१

प्रमांक - सी/यूएलसी/कक्ष - १३ /एस.आर. - ४/७०७
दिनांक 20/१२/२००७

प्रति,
मे. वनाथिया गृहनिर्माण प्रायव्हेट लिमिटेड,
३४९, बिजनेस पॉईंट, ५ वा मजला,
वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, अंधेरी (पूर्व), मुंबई - ६९

विषय :- नागरी जमिन कमाल धारणा अधिनियमांतर्गत अतिरिक्त असलेल्या व प्राथमिक तसेच माध्यमिक शाळेच्या आरक्षणाने बाधीत असलेल्या भूखंडाचे वाटप करणे बाबत

---

मौजे - जुहू, तालुका - अंधेरी, येथील न.भू.क्र. ९३, क्षेत्र १४२३.८१ चौ.मी. या मिळकतीबाबत

संदर्भ :- शासनाकडील पत्र क्रमांक - नानका - १० /(२००७)/प्र.क्र. १२६/नानकधा - १/ दिनांक : १८/१२/२००७

महोदय,

उपरोक्त संदर्भित शासनाकडील पत्रान्वये नागरी जमिन कमाल धारणा अधिनियमांतर्गत शासनाने स्वीकृत केलेल्या धोरणानुसार विकास आराखड्यातील नियोजित वापरामध्ये प्रचलित आरक्षणाखालील जमिन आपणास सदर जमिनीची सिध्दगणकानुसार होणारी प्रचलित बाजारभावाची संपूर्ण किंमत शासनाला अदा करण्याच्या अटीच्या तसेच, महानगरपालिकेच्या विकास परवानगीच्या अधीन राहून विकास नियंत्रण नियमावलीनुसार विकसित करण्यासाठी वाटप करण्यात आली आहे.

My Document 150 - MQ

त्यानुसार या कार्यालयातील नगर रचना कक्षाकडून सदर अतिरिक्त घोषित क्षेत्राचे काढलेले मुल्यांकन पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १) जमिनीचा तपशिल = | मौजे - जुहू, तालुका - अंधेरी, अतिरिक्त घोषित क्षेत्र १४२३.८१ चौ.मी. (प्राथमिक शाळेच्या आरक्षणाने बाधीत क्षेत्र) |
| २) सिध्दगणकानुसार जमिनीचा दर = रुपये ५८,४०० प्रती चौ.मी. | |
| ३) बाजारभावाप्रमाणे सदर जमिनीची होणारी किंमत = १४२३.८१ X ५८,४०० = ८,३१,५५,२६४/- (रुपये आठ कोटी, एकतीस लाख, पंचावन्न हजार दोनशे चौसष्ट फक्त) | |

सदरची रक्कम खाली नमूद लेखाशिर्षाखाली रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया येथे चलनाने हे पत्र मिळाल्यापासून तीन महिन्याचे आत शासनास अदा करावी.

१४७५ - इतर सर्वसाधारण आर्थिक सेवा
८०० - इतर जमा
०३ इतर जमिनीची नुकसान भरपाईची रक्कम
१४७५००४४(०३)

(कृपया - २)

Scanned by CamScanner

सदर रक्कम अदा केल्यानंतर चलनाची मूळ प्रत या कार्यालयात सादर करावी. तद्नंतर प्रकरणी जमिनीचा विकास करणेबाबतचे पुढील आदेश पारीत करणेत येतील.

आपला

(एस्.आर्. जोंधळे)
अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी
(ना.क्षे.क.म. ) बृहन्मुंबई

My Document/ 054 - WQ

Scanned by CamScanner

क्र. नाजक १०(२००७)/प्र.क्र.१२६/नाजकधा-१
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २ डिसेंबर,२००८.

प्रति,
जिल्हाधिकारी ,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, शासकीय वसाहत,
वांद्रे (पूर्व ), मुंबई - ५१.

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा
दिनांक :- 8 DEC 2008
आवक 29068
सं.क्र. III-E
23/12

विषय - नागरी जमीन कमाल धारणा अधिनियमांतर्गत शासनाने ताब्यात घेतलेले व महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या आरक्षणाने बाधित असलेले क्षेत्राचा ताबा देण्याबाबत.

संदर्भ - १) शासनाचे सम क्रमांकीत दिं. १४.१२.२००७ चे पत्र
२) अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम\प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समुह यांचे शासनाकडील पत्र क्र. सी/युएलसी/कक्ष -१३/ एसआर-७/७०७, दि. ६.८.२००८.
३) मे. कनाकीया स्पेसेस यांचे शासनाकडील दि. २१.११.२००८ चे पत्र.

महोदय,

जमीनधारक धुन सोराबजी पटेल यांचे न.भू.क्र. ९३, मौजे जुहू, ता. अंधेरी येथील शासनाने नाजकधा अधिनियमांतर्गत ताब्यात घेतलेले १४२३.८१ चौ.मी. क्षेत्र विकास आराखडयातील महानगरपालिका प्राथमिक शाळेच्या आरक्षणाने बाधित असून सदर क्षेत्र शैक्षणीक प्रयोजनाचे बांधकाम करण्यासाठी मे. कनाकीया गृहनिर्माण प्रा.लि. यांना प्रचलित रेडीरेकनरनुसार होणारी किंमत आकारुन वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सदर क्षेत्राची रेडी रेकनरनुसार होणारी शासन देय रक्कम आकारण्याच्या सूचना सक्षम प्राधिकाऱ्यांना संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या.

त्याअनुषंगाने संबंधित संस्थेने प्रस्तुत जमीनीची प्रचलित रेडीरेकनरनुसार होणारी किंमत तसेच त्यावरील व्याजाची रक्कम असे रुपये ७,९६,४१,०९१/- शासनाला अदा केली असून प्रस्तुत जमीन सबंधित संस्थेच्या नावे करण्याच्या



Scanned by CamScanner

अनुषंगाने पुढील आदेश व्हावेत असे संदर्भ क्र. २ च्या पत्राद्वारे शासनाला कळविले आहे. अर्जदार संस्थेने शासनदेय रक्कम शासनाला अदा केली असल्याने प्रस्तावाधीन जमीन संबंधित संस्थेला अभिहस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रकरणात अर्जदार संस्थेने जमीनीची प्रचलित रेडीरेकनरनुसार होणारी किंमत शासनाला अदा केली असल्याने जमीन वितरणाच्या आदेशात कोणत्या अटी व शर्ती विहित कराव्यात याबाबतचे अभिप्राय महसूल व वन विभागाकडून मागविण्यात आले असून त्याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

सबब, यासंदर्भात आपणास असे कळविण्याचे मला आदेश आहेत की, प्रस्तावाधीन जमीनीचा वापर विकास नियंत्रण नियमावलीतील आरक्षणानुसार शैक्षणीक प्रयोजनासाठीच करण्याच्या तसेच वर नमूद केल्यानुसार वितरण आदेशातील अन्य अटी व शर्तीनुसार करण्याच्या अटीस अधिन राहून सदर जमीनीचा ताबा सबंधित संस्थेस देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. सदर कार्यवाही करताना वितरण आदेशातील अन्य अटी व शर्ती अर्जदार संस्थेवर बंधनकारक रहातील अशा आशयाचे बंधपत्र घेण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल या विभागास सादर करावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

( सु.भि. पाटणकर )

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत : १) अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नाजकधा, बृहन्मुंबई यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२) मे. कनाकीया गृहनिर्माण प्रा.लि. ३४९,बिझनेस पॉईंट पाचवा मजला वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००६९.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत

सत्यप्रत

शासकीय माहिती अधिकारी तथा
चिटणीस, मुंबई उपनगर जिल्हा

Scanned by CamScanner

# ताबापावती

मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील क्र. १७/३अ/कावि-१००/०९ दिनांक ९/४/२००९ अन्वये नगर भूमापन जुहू , ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ९३ क्षेत्र १४२३.८१ चौ.मी. या जमिनीचा ताबा देणेकामी , मा. नगर भूमापन अधिकारी , विलेपार्ले यांचे कार्यालयाकडून आगाऊ नोटीशीद्वारे नेमलेले आज दिनांक २७/४/२००९ रोजी समक्ष जागेवर परिरक्षण भूमापक हे हजर राहिले असून , मे. कनाकिया गृहनिर्माण प्रा.लि. यांचेतर्फे मी खालील सही करणार श्री. राजेश वि. पटेल , संचालक यांनी सदर जमिनीचा ताबा घेतला. सदर नगर भूमापन जूहू , ता. अंधेरी येथील न.भू.क्र. ९३ क्षेत्र १४२३.८१ चौ.मी. या जमिनीचा ताबा घेतल्याची पोहोच म्हणून ही ताबेपावती लिहून दिली आहे.

**ठिकाण – जुहू**

**दिनांक- २७/४/२००९**

| ताबा देणार | | ताबा घेणार |
|---|---|---|
| (सही) | माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत सत्यप्रत | KANAKIA GRUHNIRMAN PVT. LTD. |
| (वि.जं. म्हात्रे) | (सही) | Rajesh V. Patel 27/4/09 |
| परि. भूमापक क्र. १ | शासकीय माहिती अधिकारी तथा चिटणीस, मुंबई उपनगर जिल्हा | (राजेश विनोद पटेल) Director |

Scanned by CamScanner